संत भक्तराज महाराज यांची शिकवण (खंड १)

# साधनेविषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


– ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ५
– ग्रंथासंदर्भात साधकांना आलेल्या अनुभूती ७


### प्रकरण


१. भूमिका १०
२. आमचे सद्गुरु प.पू. भक्तराज महाराज १८
३. प्रत्यक्ष शिकवणे २२


### प्रकरण १
### भूमिका


१. पहिल्या आवृत्तीची भूमिका १०
२. दुसऱ्या आवृत्तीची भूमिका १५
३. तिसऱ्या आवृत्तीची भूमिका १६
४. चौथ्या आवृत्तीची भूमिका १६
५. पाचव्या आवृत्तीची भूमिका १६


### प्रकरण २
### आमचे सद्गुरु प.पू. भक्तराज महाराज


१. आध्यात्मिक जीवनातील प्रमुख घटना १८
२. भजन १९

३. भ्रमण १९
४. भंडारा २०
५. प्रीतीरूप बाबा २०
६. उत्तम गुरु २०
७. भजनांतून शिकविणे २१

## प्रकरण ३
## प्रत्यक्ष शिकवणे

१. उद्धटपणे विचारलेल्या प्रश्नाचेही बाबांनी उत्तर देणे २५
२. भौतिक प्रगती २६
३. इतर धर्म आणि सनातन धर्म २६
४. साधक आणि साधना २६
* दुःख २६
* श्रद्धा २७
* प्रेम आणि प्रीती २८
* राग आणि चिडचिडेपणा सोडा, तरच शांती मिळेल ! २९
* कोणतीतरी साधना करा २९
* पैसा ३०
* संतांशी वागणे ३१
* चरणांवर डोके ठेवणे (अर्थ) ३३
* प्रसाद ३४
* संतांचा आशीर्वाद ३४
* सेवेचे महत्त्व ३५
* व्यवहारातील वागणे ३५
* संसारात राहून साधना ३८
५. शिष्य ४४
* गुरूंची परीक्षा ! ४४
* गुरु कोणाला करावे ? ४४

* गुरुमंत्र ४४
* गुरूंचे उच्छिष्ट ४५
* शिष्याच्या श्रद्धेत गुरूंची महती सामावलेली असणे ४५
* गुरूंच्या नावे धंदा नको ४६
* भंडारे आणि शिष्याचे कर्तव्य ४६
* गुरुबंधूंवर टीका करू नये ४७
* गुरूंचे दुखणे आणि गुर्वाज्ञा ४८
* अनुभूतीत अडकू नका ! ४९
६. गुरु ४९
* गुरूंचे महत्त्व ५०
* कार्य ५१
* गुरु म्हणजे शरीर नव्हे ५२
* गुरु, सद्गुरु आणि परात्पर गुरु ५२
* गुरूंचा शिष्याविषयीचा भाव ५२
* शिष्याला शिकविणे ५३
* शिष्याला साधनेच्या पुढच्या टप्प्यात नेणे ५३
* गुरु आणि शिष्य यांची एकरूपता ५८
* वागणे ५९
* सर्व शिष्यांविषयी समभाव ५९
७. भक्तीयोग ६०
* महत्त्व ६०
* देवाची भक्ताला साधनेकडे वळवण्याची पद्धत ६१
* देहबुद्धी विसरण्याचे महत्त्व ६२
* देवदर्शन ६२
८. कर्मयोग ६३
९. ध्यानयोग ६४
१०. ज्ञानयोग ६४
* महत्त्व ६४

* ज्ञानाचे अपूर्णत्व ६४
* कार्यानुमेय ज्ञान होणे ६४
* 'कोऽहं' आणि 'सोऽहं' ६५
* जीवात्मा आणि शिवात्मा ६६
* ब्रह्म आणि माया ६६
* शून्यावस्था आणि महाशून्यावस्था ६९
११. अहंभाव नको ७१
* 'मी', 'माझे' नको ७१
* कोणत्याही अर्थी 'मी' नको ७१
* सूक्ष्म अहंभाव ७३
१२. संत ७३
* देहप्रारब्ध आणि बंधन ७३
* ओरडणे आणि शिव्या देणे ७४
* संतांच्या भ्रमणामागील खरे कारण ७६
* व्यावहारिक प्रश्न आणि संत ७७
* देहबुद्धी नसणे ७८
* स्वतःचे तीर्थ घेणे ७९
* संत, गुरु आणि देवता ७९
* भावावस्था ८१
* अध्यात्मप्रसाराविषयीचा दृष्टीकोन ८५
* कोणती भजने कधी म्हणावीत ? ८६
* आश्रम कसा असावा ? ८७
* आता उरलो उपकारापुरता ९२
* बाबांची स्मृतीचिन्हे ९२
* उन्नतांचा पुनर्जन्म ९२

# मनोगत

## १. पहिल्या आवृत्तीची भूमिका
## ( गुरुपौर्णिमा, कलियुग वर्ष ५०९४ [१४ जुलै १९९२] )

**१ अ. मर्यादा :** आमचे सद्गुरु प.पू. भक्तराज महाराज यांना आम्ही 'बाबा' म्हणतो. गेल्या तीन-चार वर्षांत बाबांनी वेळोवेळी अध्यात्मासंबंधी बरेच विषय (मुद्दे) सांगितले आणि ते आम्ही लिहून घेतले. 'ते विषय जिज्ञासू आणि साधक यांना ज्ञात व्हावेत, यासाठी एक पुस्तक लिहावे', असा विचार आमच्या मनात गेली दोन-तीन वर्षे सतत येत होता. 'या गुरुपौर्णिमेच्या (म्हणजे गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दिवसाच्या) निमित्ताने सर्व लिखाण पूर्ण करावे', असे वाटले; पण लिखाणाला प्रारंभ करतांना आम्हाला आमच्या पुढील मर्यादा लक्षात आल्या.

**१ अ १. अल्प ज्ञान :** बाबांना असलेल्या अनंत ज्ञानाची अत्यंत अल्प अशी ओळख आम्हाला झालेली आहे. त्याला आम्ही 'ज्ञान' मुळीच म्हणू शकत नाही. सहा आंधळ्यांनी त्यांना हत्तीचा पाय, कान, शेपूट आदी जो भाग हाताला लागला, त्यावरून हत्तीची कल्पना करण्याचा प्रयत्न केला, तसेच बाबांच्या शिकवण्याविषयी लिहायचा प्रयत्न केला, तर होणार', हे तीव्रतेने जाणवले.

**१ अ २. बुद्धी आणि शक्ती यांची उणीव :** बाबांचे शिकवणे खऱ्या अर्थाने समजण्यासाठी आणि लिखाणासाठी आणखी पुष्कळ जास्त बुद्धी अन् शक्ती यांची आवश्यकता आहे. बाबांनी कितीही शिकवलेले असले, तरी आमच्या क्षमतेनुसार आम्ही ते समजून घेणार आणि कळलेले शब्दांत मांडणार. या सगळ्या प्रक्रियेत बाबांना अभिप्रेत असलेले आणि आम्ही लिहिलेले, यात पुष्कळ अंतर पडू शकते.

**१ अ ३. बुद्धीअगम्य ज्ञानाविषयी काय लिहिणार ? :** अध्यात्मातले केवळ २ टक्के ज्ञान बुद्धीगम्य आहे, तर ९८ टक्के ज्ञान बुद्धीअगम्य आहे, म्हणजे त्याची केवळ अनुभूती घेता येते; म्हणूनच 'त्यातल्या अनुभूती साधनेने घ्या', या एका वाक्याव्यतिरिक्त त्यात लिहिण्यासारखे आणखी काय आहे', हा विचारही पुनःपुन्हा मनात आला.

**१ अ ४. आमच्या शब्दांतील चैतन्याची उणीव :** एखादा विषय सारख्याच शब्दांत आम्ही सांगितला आणि बाबांनी सांगितला, तर ऐकणाऱ्यावर किंवा वाचणाऱ्यावर होणारा परिणाम आमच्या

शब्दांनी अल्प अन् बाबांच्या शब्दांनी जास्त होतो. बाबांचे शब्द चैतन्यमय असल्याने तसे होते.

**१ अ ५. शब्दार्थ आणि भावार्थ यांतील अंतर :** शब्दाला मर्यादा असल्याने प्रत्येक भाव योग्य शब्दांत व्यक्त करता येत नाही; म्हणूनच शब्दार्थ आणि भावार्थ यांत नेहमीच अंतर असते. हे अंतर विज्ञानाच्या तुलनेत अध्यात्मविषयक लिखाणाच्या वेळी फार प्रकर्षाने जाणवते. तसेच आध्यात्मिक लिखाणाचा अर्थ लावणे, हे साधकाच्या आध्यात्मिक पातळीवर अवलंबून असल्याने प्रत्येक साधकाला त्याचा वेगवेगळा भावार्थ जाणवतो.

**१ अ ६. 'समजा बाबांनी निराळे सांगितले तर' हा विचार :** या सगळ्यात भर म्हणून कि काय, २९ मार्च १९९२ या दिवशी पुण्याला असतांना बाबा म्हणाले, "डॉक्टर (डॉ. जयंत आठवले), तुम्ही अध्यात्माच्या अभ्यासवर्गात जे काही शिकवता, त्याच्या उलटे समजा मी तुमच्या वर्गाला येणाऱ्यांना सांगितले, तर काय होईल ?" माझ्या मनात हीच शंका असायची. तीच बाबांनी बोलून दाखवली होती. 'अभ्यासवर्गाला येणाऱ्यांच्या मनात अध्यात्माविषयी प्रयत्नपूर्वक निर्माण केलेली श्रद्धा, 'डॉक्टर सांगतात, ते सत्य' हा त्यांचा दृढविश्वास अशाने कोलमडून पडेल. मग त्यांची साधना आणि प्रगती नीट होणार नाही', अशा प्रकारचा विचार माझ्या मनात कधी कधी यायचा. 'मी चुकीचे शिकवले, तर माझ्याविषयी त्यांना काय वाटेल', हा विचार त्यात नसायचा, तर त्यांच्याच प्रगतीचा विचार मनात यायचा. बाबांनी वरील प्रश्न विचारल्यावर अर्थातच माझ्याकडे त्याचे उत्तर नव्हते; म्हणून मी स्तब्ध राहिलो. बाबा पुढे काय बोलतात, याची उत्सुकतेने, कान टवकारून वाट पहात राहिलो. स्वतःच्याच प्रश्नाचे उत्तर म्हणून बाबा म्हणाले, "तसे झाले, तर 'निराळ्या संदर्भात डॉक्टर अमुक एक बोलले असतील', 'त्यांच्या बोलण्याचा भावार्थ तसा होता', 'तुमच्या त्या वेळच्या पातळीला अनुसरून डॉक्टरांनी तसे उत्तर दिले असेल', इत्यादी काहीतरी मी सांगेन." म्हणजे बाबा श्रद्धा ढळू देणार नव्हते तर ! पण तरीही हे उत्तर निश्चितच माझ्या लिहिण्याच्या विचारांना मोडता घालणारे होते. अर्थात स्वतःच्या शिष्यांना ते चुकत असले, तरी सद्गुरु किती सांभाळून घेत असतात, याची ती पावतीच होती.

**१ आ. गुरुदक्षिणा :** या सर्व मर्यादांमुळे 'आपण काहीच लिहायचे नाही', या निष्कर्षाप्रत आम्ही आलो आणि तसे बाबांच्या सान्निध्यात तीस-पस्तीस वर्षे असलेल्या एका जुन्या शिष्यांना सहज बोलतांना सांगितले. तेव्हा ते उत्स्फूर्तपणे म्हणाले, "डॉक्टर, बाबांनी शिकवलेले तुम्ही लिहिलेच पाहिजे. गुरुकृपेची अंशतः भरपाई करण्याचा तो एक मार्ग आहे." तो विचार मनावर एवढा परिणाम

करून गेला की, ‘लिहिले पाहिजे’, असे पुन्हा प्रकर्षाने वाटायला लागले.

**१ इ. लिखाणाचा श्रीगणेशा :** एकाच वेळी ‘लिहिले पाहिजे’ आणि ‘लिहिण्याची आपली क्षमता नाही’, अशा संभ्रमात सापडलो होतो. असेही ठरवले, ‘हस्तलिखित बाबांना दाखवायचे आणि त्यांना ते टाकाऊ वाटले, तर टाकून द्यायचे.’ थोडक्यात म्हणजे, ‘लिहायचे तर सत्यच लिहायचे, नाहीतर लिहायचे नाही. नुसते टाकाऊ (रद्दी) काहीतरी निर्माण करायचे नाही. मग स्वतः काहीएक विचार न करता सर्व बाबांवरच सोपवायचे आणि जे होईल, ते साक्षीभावाने पहायचे’, असे आम्ही ठरवले. ‘अध्यात्मशास्त्र’ या ग्रंथाचे लिखाण आणि ‘साधना’ अभ्यासवर्गांसाठीचे लिखाण यांत पुष्कळ मास (महिने) जात राहिले. गुरुपौर्णिमेला, म्हणजे १४.७.१९९२ या दिवशी ग्रंथ हातात हवा असला, तर निदान तीन मासतरी आधी छपाईसाठी मुद्रणालयात द्यायला हवा होता, म्हणजे १४ एप्रिलला पुस्तक लिहून पूर्ण झाले पाहिजे. एप्रिल उजाडला, तरी लिखाणाला प्रारंभ झाला नव्हता. शेवटी सोमवार, ६ एप्रिल १९९२ या दिवशी सकाळी उठलो, ते निराळ्या उत्साहाने आणि लिखाणाला आरंभ केला. तेव्हा लिखाणाच्या संदर्भात बाबांशी आतापर्यंत विविध प्रसंगी झालेले बोलणे आठवले.

**१ ई. इदं न मम ।**

**१ ई १. स्वेच्छा आणि ईश्वरेच्छा :** प्रथम अध्यात्मावर ग्रंथ लिहिणार होतो, ते आमच्या इच्छेने. पुढे स्वेच्छा उरली नाही, तेव्हा ग्रंथ लिहिण्याचा विचार मनातून गेला. मग बाबा म्हणाले, “लिहा.” तेव्हा लिहिण्याचा विचार पुन्हा मनात आला; पण त्याच वेळी ‘आता ग्रंथ खरोखरीच चांगला लिहिला पाहिजे’, असे मनात आले; कारण आता ग्रंथ ‘गुरूंचा शिष्य’ म्हणून लिहायचा होता.

पूर्वी जेव्हा ‘डॉ. आठवले’ म्हणून लिहिणार होतो, तेव्हा तो कसाही असला, तरी प्रश्न नव्हता. त्यात गुरूंना कोणी नावे ठेवली नसती. या विचारामुळे ‘ग्रंथ चांगला कसा होणार’, हा आमच्या मनावर ताण आला. ही काळजी आम्ही बाबांना बोलून दाखवली. तेव्हा बाबा म्हणाले, “मीच तुमच्यातून ग्रंथ लिहिणार आहे. तुम्ही केवळ बघत रहा.”

२७ मे १९९२ या दिवशी जव्हारला या ग्रंथाचे हस्तलिखित बाबांना वाचून दाखवायला गेलो असता बाबा म्हणाले, “काळजी करू नका. तुमच्या मनासारखा ग्रंथ होईल.” एरव्ही एखाद्याने गुरूंना सांगितले असते, “मी ग्रंथ चांगला लिहीन. तुम्ही काळजी करू नका.” येथे बाबाच आम्हाला निश्चिती देत होते !

बाबांच्या कृपाशीर्वादानेच ६ एप्रिल ते २१ मे या काळात, म्हणजे अवघ्या सहा आठवड्यांत नेहमीचे सर्व व्याप सांभाळून या ग्रंथाचे लिखाण आमच्याकडून पूर्ण झाले.

**१ ई २. लिखाणाचा अहंकार नको :** ३० सप्टेंबर १९९० या दिवशी बाबांशी पुढील प्रश्नोत्तरे झाली.
बाबा : तुम्हाला सांगितलेल्या सर्व माहितीचे पुस्तक लिहिणार का ?
डॉ. जयंत आठवले : स्फूर्ती येईल तसे; पण योग्य उत्तर काय असायला हवे होते ?
बाबा : हेच उत्तर योग्य आहे. 'स्फूर्ती येईल तसे'मध्ये 'मला वाटले तर', 'मी लिहिणार आहे', असे नाही. 'स्फूर्तीदाता कोणीतरी निराळा आहे', याची जाणीव आहे.

**१ ई ३. संकलक आणि लेखक :** वरील संभाषणावरून ग्रंथावर नुसते 'लेखक' म्हणून आमचे नाव न लिहिता 'संकलक' म्हणूनही का लिहिले आहे, हे लक्षात येईल. 'नामसंकीर्तनयोग', 'सुवचनांतून शिकवणे (सुवचनांचा भावार्थ)', 'प्रत्यक्ष शिकवणे' आणि 'परीक्षेतून शिकवणे' या प्रकरणांत बाबांनी सांगितले तेच पूर्णतः लिहिले आहे, म्हणजे 'संकलक' म्हणून आम्ही काम केले आहे. 'भूमिका', 'आमचे सद्गुरु प.पू. भक्तराज महाराज', 'विनोदांतून शिकवणे', 'वागण्यातून (अप्रत्यक्ष) शिकवणे', 'अनुभव / अनुभूती यांतून शिकवणे' आणि 'स्वप्नांतून शिकवणे' या प्रकरणांच्या संदर्भात 'लेखक' म्हणून फारतर आमचे नाव लिहिता येईल. 'फारतर', असे म्हणण्याचे कारण असे की, ही प्रकरणेही बाबांनीच आमच्याकडून लिहून घेतली आहेत, अशी आमची श्रद्धा आहे; म्हणूनच येथे 'लेखक' हा शब्द रूढ अर्थानेच घ्यावयाचा आहे. एकूण काय, तर या ग्रंथातील थोडीफार शब्दरचना जरी आमची असली, तरी विचार सर्वस्वी बाबांचेच आहेत.

**१ उ. विषय :** पुनरावृत्ती टाळण्यासाठी शक्यतो भावार्थासह बाबांची भजने असलेल्या 'संत भक्तराज विरचित भजनामृत' या ग्रंथात किंवा बाबांच्या जीवनचरित्रात स्पष्ट न केलेले आणि न सांगितलेले विषय या ग्रंथात घेतले आहेत. भजने आणि सुवचने यांतून बाबांनी बरेच काही शिकवलेले आहे; पण त्याचा भावार्थ न कळल्याने बरेच जण बाबा सांगत असलेल्या ज्ञानाला मुकतात. तसे होऊ नये, म्हणून त्यांच्या अनेक भजनपंक्तींचा भावार्थ 'भजनामृत' या ग्रंथात आणि सुवचनांचा भावार्थ येथे दिला आहे. 'नाम' ही तर बाबा सांगत असलेली प्रमुख साधना. त्यासंबंधीचे विवरण 'नामसंकीर्तनयोग' या प्रकरणात दिले आहे. निरनिराळ्या प्रसंगांतील त्यांच्या वागण्याचा आणि बोलण्याचा भावार्थ समजावून सांगणे, हासुद्धा या ग्रंथाचा एक हेतू आहे. यामुळे निरनिराळ्या प्रसंगी आपल्याला अनाकलनीय वाटेल, अशा प्रकारे संत आणि अवतार जे वागतात अन् बोलतात, त्याचा अर्थ कळणे साधकांना सोपे जाईल.

'भूमिका' ही या ग्रंथाची एक प्रकारे प्रस्तावनाच आहे. 'भूमिके'त साधकांना उपयुक्त असे

काही विषय आहेत; म्हणून ‘भूमिके’ला ‘प्रकरण’ असे म्हटले आहे.

ठिकठिकाणी लिहिलेल्या बाबांच्या भजनपंक्ती ‘संत भक्तराज विरचित भजनामृत’ या ग्रंथातील आहेत.

**१ ऊ. आभार :** या ग्रंथाच्या लिखाणात अनेक गुरुबंधूभगिनींचे साहाय्य झाले आहे. सर्वांचे व्यक्तीशः आभार मानणेच काय, तर उल्लेख करणेही अशक्य आहे. या ग्रंथाचे मुद्रणपूर्व हस्तलिखित सुवाच्य अक्षरात लिहून देण्याचे काम प्रा. डॉ. (सौ.) लीला जोशी यांनी रात्रंदिवस जागून करून दिले. लिखाणात ठिकठिकाणी लिहिण्यासाठी बाबांच्या योग्य त्या भजनपंक्ती प.पू. रामानंद महाराज आणि कु. सीमा गरुड यांनी सुचवल्या. ग्रंथाचे सुंदर मुखपृष्ठ आमचे मित्र श्री. किशोर प्रभाकर करमरकर यांनी करून दिले. प.पू. हरि ॐ बागवे आणि बाबा या दोन संतांचे एकमेकांवरील प्रेम लक्षात घेऊन ‘सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस’चे मालक श्री. लवूशेट आणि श्री. अशोकशेट बागवे यांनी अतिशय अल्प वेळेत हा ग्रंथ छापून दिला, नाहीतर गुरुपौर्णिमेला हा ग्रंथ उपलब्ध होऊच शकला नसता. यासाठी त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

**१ ए. अपूर्ण :** श्री गुरूंची शिकवण अनंत असल्यामुळे तिच्याविषयीचे लिखाण पूर्ण होऊ शकत नाही. त्यात पूर्णत्व आणण्यासाठी प्रत्येकाने साधना करून स्वतः अनुभूती घेणे, हाच शिकवण पूर्ण करण्याचा एकमेव मार्ग आहे.

डॉ. जयंत बाळाजी आठवले
डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले
**संकलक आणि लेखक**

## २. दुसऱ्या आवृत्तीची भूमिका
## ( प.पू. भक्तराज महाराज यांचा अमृतमहोत्सव, माघ शुक्ल नवमी, कलियुग वर्ष ५०९६, [९ फेब्रुवारी १९९५] )

**२ अ. महत्त्वाचे पालट :** श्री गुरूंची शिकवण अनंत असल्यामुळे त्याविषयीचे लिखाण पूर्ण होऊ शकत नाही. पहिल्या आवृत्तीनंतर आता दोन वर्षे होऊन गेली आहेत. तेव्हापासून आतापर्यंतच्या काळात बाबांनी आणखी भरपूर काही शिकवले. ते विषय या आवृत्तीत घेतले आहेत.

‘स्वप्नांतून शिकवणे’ आणि ‘शब्दातीत माध्यमातून शिकवणे’ ही प्रकरणे नवीन आहेत.

‘प्रकरण २. आमचे सद्‌गुरु प.पू. भक्तराज महाराज’ यातील काही भाग वगळला आहे; कारण आता आम्ही संकलित केलेले ‘संत भक्तराज चरित्र’ उपलब्ध आहे.

**२ आ. केवळ संकलक :** पहिल्या आवृत्तीच्या भूमिकेत आम्ही ग्रंथावर ‘लेखक’ म्हणून आमचे नाव न लिहिता ‘संकलक आणि लेखक’ म्हणून का लिहिले आहे, हे स्पष्ट केले होते. त्यात असेही लिहिले होते, ‘ग्रंथातील थोडीफार शब्दरचना जरी आमची असली, तरी विचार हे सर्वस्वी बाबांचेच आहेत.’ त्या आवृत्तीला आता दोन वर्षे झाली आहेत. या काळात आमच्या हेही लक्षात आले आहे की, शब्दरचनाही आमची नाही; म्हणूनच या आवृत्तीत केवळ ‘संकलक’ म्हणून आमचे नाव लिहिले आहे.

या सर्व विचाराला पूरक असे बाबांचे बोलही नंतर आठवले. चार-पाच वर्षांपूर्वी बाबा एकदा म्हणाले होते, ‘‘मला भरपूर लिहायचे आहे. मी तुमच्याकडे येऊन रहातो.’’ आम्ही वेड्यासारखे बाबांनी येऊन रहायची वाट पहात होतो. पुढे भावार्थ लक्षात आला की, ‘तुमच्याकडे’ म्हणजे ‘घरी’ नाही, तर ‘शरिरात’. पहिल्या आवृत्तीच्या भूमिकेत बाबांनी आम्हाला सांगितलेले पुढील वाक्य लिहिले आहे, ‘मीच तुमच्यातून ग्रंथ लिहिणार आहे.’ बाबांनी एवढे स्पष्ट सांगूनही आम्हाला ‘तुमच्याकडे’ या शब्दाचा अर्थ कळायला आणखी काही वर्षे जावी लागली !

**२ इ. बाबांनी केलेले कौतुक :** बाबांना या ग्रंथाचे हस्तलिखित दाखवल्यावर ते म्हणाले, ‘‘माझ्या शिकवणीचे सार यात आले आहे.’’ **- संकलक**

## ३. तिसऱ्या आवृत्तीची भूमिका

## ( नरक चतुर्दशी, कलियुग वर्ष ५१०० [१९ ऑक्टोबर १९९८] )

९ फेब्रुवारी १९९५ या दिवशी बाबांचा अमृतमहोत्सव झाल्यावर त्यांची प्रकृती ढासळली. तेव्हापासून १७ नोव्हेंबर १९९५ ला बाबांनी देहत्याग करीपर्यंत बहुतेक काळ आम्ही बाबांच्या समवेत राहिलो. प्रकृती ठीक नसतांनाही तेव्हा बाबांनी बरेच काही शिकवले. ते सर्व या तिसऱ्या आवृत्तीत समाविष्ट करण्यात आले आहे. **- संकलक**

## ४. चौथ्या आवृत्तीची भूमिका

## ( मकरसंक्रांत, कलियुग वर्ष ५१०८ [१४ जानेवारी २००७] )

बाबांच्या देहत्यागानंतरही त्यांच्या अनंत शिकवणीतील आणखी काही नवीन विषय त्यांच्या

सान्निध्यात राहिलेल्या काही भक्तांकडून मिळत गेले. ते विषय या चौथ्या आवृत्तीत समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे होणाऱ्या ग्रंथाच्या पृष्ठसंख्यावाढीच्या कारणास्तव या चौथ्या आवृत्तीची आम्ही नव्याने २ भागांमध्ये ('खंड १' आणि 'खंड २') पुनर्मांडणी केली. **- संकलक**

## ५. पाचव्या आवृत्तीची भूमिका

**( वटपौर्णिमा, कलियुग वर्ष ५१११ [७ जून २००९] )**

प.पू. भक्तराज महाराजांच्या काही भक्तांनी पाठवलेले नवीन लिखाण या आवृतीत अंतर्भूत केले आहे. पृष्ठसंख्यावाढीच्या कारणास्तव या पाचव्या आवृत्तीची आम्ही नव्याने ३ भागांमध्ये पुनर्मांडणी केली आहे - 'खंड १ : साधनेविषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन', 'खंड २ : साधनाविषयक सुवचने' अन् 'खंड ३ : नामाची महती आणि शिकवण्याच्या विविध पद्धती'.

हा ग्रंथ वाचून काही जणांनी तरी साधनेला आरंभ करावा, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना !

डॉ. जयंत बाळाजी आठवले

डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले

**- संकलक**